**ठळक मुद्दे-**

- **पाठाचे नाव – ऊन सावलीचा श्रावण**
- लेखक- आसाराम लोमटे
- श्रावणाचे बहारदार वर्णन
- श्रावणात येणारे विविध सण
- बायकांना श्रावणाविषयी वाटणारा जिव्हाळा.
- श्रावणाचे मानवीजीवनातील स्थान
- वर्णनपर निबंधाचे उदाहरण

**प्रस्तावना**

प्रत्येक ऋतूचे स्वत:चे वौशिष्ट्य असते. हे वैशिट्य आपल्याला कशामुळे जाणवते? आपल्या आजूबाजूच्या निसर्गातून, त्याच्या रंगातून, वातावरणाच्या बदलातून. ह्यासर्वाचा आपल्यावर परिणाम नाही झाला तरच नवल! माणूस निसर्गाचाच भाग आहे तसाच निसर्गावर मोठ्याप्रमाणात अवलंबूनही आहे. म्हणूनच ऋतूबदलाप्रमाणे आपले राहणीमान, दैनंदिन कामकाजही तो बदलतो. विशेषत: शेतीची कामे करणारे शेतकरी आणि ग्रामीण जीवन, निसर्गाशी अधिक बांधलेले आहेत असे दिसते. निसर्गातील बदल माणूस फक्त स्वीकारतो असे नाही तर त्या निसर्गाला आपल्या आयुष्यात सहभागी करून घेतो. आपले सण-वार ऋतूनुरूप सजवतो, बदलतो आणि साजरे करतो. 'ऊनसावलीचा श्रावण' ह्या पाठातून श्रावण महिन्यात मानवी व्यवहारात काय बदल घडतात आणि श्रावण त्यात कसे रंग भरतो ह्याचे एक छान,टवटवीत चित्र पाहायला मिळते.

**श्रावणाचे वेगळेपण**

श्रावण हा असा महिना आहे जो माणसाला चैतन्य देतो, त्याच्यात उत्साह भरतो. श्रावणातील सणांची गाणी, पोथ्या, माणसांच्या श्रद्धा ह्या सर्वांमध्ये श्रावणाचे अस्तित्त्व आहे. जसा बाहेर निसर्गात भरभरून दिसतो तसा माणसांच्या घरा दारात आणि व्यवहारातही त्याने हजेरी लावली आहे.

झाडाला झोके बांधून पोरी-बाळींनी झोके घेणे, नागपंचमी, मंगळागौर, कानबाई, नारळीपौर्णिमा, पोळा ह्यांसारखे सण ही श्रावण महिन्याची देणगी. महाराष्ट्राच्या वेगवेगळया भागात ते वेगवेगळ्या प्रकारे साजरे होतात.श्रावणाचे वैशिष्ट्य असे की आषाढातील पावसासारखा तो गर्जत, मुसळधार पडत नाही. उघडीप देत देत पडतो. शेतीच्या कामातून उसंत मिळण्याचा हाच एक महिना. तुम्हीही तुमचे मन सण-उत्सव साजरे करून ताजेतवाने व्हा असा निरोप जणू श्रावण घेऊन येतो. त्यामुळे लेखक श्रावणाकडे एक हितचिंतक व साथीदार म्हणून पाहतो.

श्रावणमहिना संपताही आनंद देऊन जातो. विशेषत: शेतीकरणाऱ्या कुटुंबाला. कारण सारे घर पोळा ह्या शेवटच्या सणात गुंतलेले असते. ज्याच्या श्रमावर शेती चालते त्या बैलाला आपली कृतज्ञता दाखवण्याचा हा

सण. त्याच्यावरील माया शेतकरी कुटुंब त्याला सजवून-रंगवून दाखवते. शेतकऱ्यासाठी हा दिवाळसणाइतका महत्त्वाचा असतो असे लेखक म्हणतो.

पेरणी होऊन, पिके वर येण्याचा हा महिना. मशागत करायची कामे असली तरी पेरण्या नसतात. त्यामुळे संपूर्ण वर्षातून, . शेतीच्या कामातून विश्रांती ह्याच महिन्यात मिळते. बायांसाठी म्हणूनच हा काळ सुखाचा व विसाव्याचा असतो. सणवारांमध्ये बायकांचाच सहभाग असतो त्यामुळे काम कमी नसते. परंतु हे सण-उत्सव त्यांच्या स्व:तासाठी असतात. गाण्यांमधून, खेळांमधून, गोडधोड करण्यातून, पूजा व्रतवैकयलातून त्यांचे श्रम हलके होतात. दु:ख हलके करणारे असतात. तो वेळ श्रावण त्यांना देतो. म्हणून श्रावण बायांना सावली वाटतो असे लेखक म्हणतो.

पाठाचे शीर्षक ‘ऊन सावलीचा श्रावण’ असे आहे. एका अर्थाने ते श्रावणाचे वर्णन आहे तर एका अर्थाने आयुष्यातील सुख दु:खाच्या खेळात निसर्गातील ऊन-सावलीचा खेळ, आनंद आणण्याचे काम करतो. असाही अर्थ शीर्षकातून प्रतीत होतो. विशेषत: बायकांच्या बाबतीत. वर्षभराचे काबाडकष्ट, संसारातील अडीअडचणी व मनातील दु:ख ह्या सर्वांचा निचरा श्रवणात होतो असे लेखकाला वाटते. म्हणूनच बायकांच्या दृष्टीने तो माहेरचा कोणी नातलग, सावली असाच भासतो असे लेखक म्हणतो.

**पाठाचे वैशिष्ट्य**

‘*आषाढातमातीवर आलेली हिरव्यागार गवताची साथ श्रावणात जणू उतू जाते*’,<br>
*‘श्रावण फक्त पाना-फुलांतच मोहरून येतो असे नाही....सगळीकडे तो बेबंद दिसू लागतो’,*<br>
*’श्रावण माहेरचे चार विरंगुळ्याचे दिवस त्यांच्या आयुष्यात फुलपाखरासारखे घेऊन येतो’,*<br>
*’श्रावण म्हणजे जणू सावलीचे ठिकाण, पिकात पाउस होऊन नाचतो तर कधी इंद्रधनुष्य होऊन आभाळाचा मांडव सजवतो.’*<br>
अशी अनेक वाक्ये तुम्ही ह्या पाठात वाचाल. अशा वाक्यांमधून श्रावण आपल्या डोळयांना वेगवेगळया रुपात दिसू लागतो. त्यामुळे काय साध्य होते,तर  श्रावणचे सजीवपण जाणवते. तो एक जादुगार आहे असे संपूर्ण पाठात वाटत राहते. स्वभावोक्ती ह्या अलंकाराचे हे अतिशय सुंदर उदाहरण म्हणता येईल. स्वभावोक्ती म्हणजे कोणत्याही प्राण्याचे, वस्तूचे, स्थळाचे वा काळाचे सामान्यजनास लक्षात न येणारे पण कवीला दिसलेले, आत्यंतिक स्वाभाविक पण वैशिष्ट्यदर्शक आणि चमत्कृतिपूर्ण असे वर्णन केलेले असते.

श्रावण महिन्याची माहिती त्यातील सणवार व व्रतवैकल्ये ह्यांची माहिती पाठातून आली आहे. परंतु वाचताना आपण माहिती वाचत आहोत असे कुठेच जाणवत नाही. कारण लेखकाची स्व:ताची दृष्टी निसर्गातील सौंदर्याचा आस्वाद आणि आनंद घेण्याची आहे. तिचा प्रभाव लेखकाच्या शैलीवरही आपल्याला जाणवतो. उपमा आणि उत्प्रेक्षा वापरल्याने भाषा काव्यमय झाली आहे.

**लेखकाची दृष्टी**

माणूस आणि निसर्गाचे साहचर्य किती सुंदर गोष्ट आहे हे ह्या पाठातून आपल्याला समजते. श्रावण हा आपल्या बाहेर नाही तर आपल्या मनातही कसा आहे हे लेखक सांगू पाहतो. त्याची प्रचीती माणसाने श्रावणावर

रचलेल्या गाण्यांमधून,खेळामधून, अभंगामधून येते असे लेखक म्हणतो. पाठातील दुसऱ्या परिच्छेदाचे ह्या दृष्टीतून लक्षपूर्वक वाचन करा.

**लेखाचे विशेष**

एक वर्णनपर लेख म्हणून ह्या पाठाचा अभ्यास करताना हे पहा. सुरुवात आणि शेवट एकाच मुद्द्याने होतो. सुरुवातीच्या व शेवटच्या परिच्छेदांच्या मधील परिच्छेदही पहा. त्यातील वैविध्य पहा. श्रावणाचे वर्णन पहिल्या आणि शेवटच्या परिच्छेदात आहे व मधल्या परिच्छेदांमध्ये सणवार, व्रतवैकल्ये, महाराष्ट्रात वेवेगळयाभागात ते कसे साजरे होतात ही माहिती मिळते. श्रावण हा केंद्रबिदू असून प्रत्येक परिच्छेदात त्याचा उल्लेख झालेला आहे. त्यामुळे माणसांच्या जीवनातील त्याचे योगदान ह्यावर लेखकाला आपले लक्ष  वेधायचे आहे. भाषा अलंकारिक आहे तशीच सहजही आहे. श्रावणाविषयीच्या विविध कल्पना वाचन करताना आपली उत्सुकता वाढवतात आणि आपल्या मनाला भावतात. वर्णनपर लेखन करताना किंवा निबंध लिहिताना ह्या गोष्टी लक्षात ठेवा.

**<u>उजळणी प्रश्न:</u>**

पुढील प्रश्नांच्या आधारे धड्याचा विचार करा व ३० ते ४० शब्दांत उतरे द्या.

१. श्रावणातील पाऊस आषाढासारखा झळ लावत नाही असे लेखक का म्हणतो?
२. श्रावण, पोरीबाळी आणि म्हताऱ्या बाया ह्यांचे नाते कोणत्या स्वरूपाचे आहे?
३. श्रावण महिन्याचे शेतकऱ्यांच्यादृष्टीने महत्त्व सांगा.

पुढील प्रश्नाच्या आधारे धड्याचा विचार करा व ५० ते ६० शब्दांत उत्तरे द्या.

१. ह्या पाठाला ?तुम्हाला आणखी कुठले नाव देता येईल ?असे नाव का दिले आहे 'ऊनसावलीचा श्रावण'
२. बायकांसाठी ह्या महिन्याचे महत्त्व वेगळे आहे.हे सांगा ते का व कसे .
३. श्रावणाचे आपल्या जीवनाशी असलेला बंध पाठातून पुढे कसा येतो ?

संदर्भासहित स्पष्टीकरण द्या:

१. 'जणू श्रावण ही सारी श्रीमंती आपल्यासोबत घेऊन येतो'
२. तर काहींच्या नशिबी जन्मभर आलेली ,निथळताना दिसते :कुणाच्या चेहऱ्यावर सुख अक्षरश' उदासी त्यांच्या चेहऱ्यांवर दिसू लागते'.
३. ' पोळा अन् पाऊस झाला भोळा'

**<u>मुक्त प्रश्न</u>**

हा सराव थोडा वेगळा आहे. तो टप्प्या टप्प्याने सोडवायचा आहे.त्यामुळे प्रश्न लक्षपूर्वक वाचा व दिलेल्या सूचनेनुसार लेखन करा.

धड्यातील आवडलेली, वाचताना वेगळी वाटलेली वाक्ये आपल्या पुस्तकात पेन्सिलने अधोरेखित करा. उदाहरण म्हणून पुढील वाक्ये पहा.

**नमुना वाक्ये-**

‘ *आषाढात मातीवर आलेली हिरव्यागार गवताची साथ श्रावणात जणू उतू जाते*’

‘*जणू श्रावण ही सारी श्रीमंती आपल्यासोबतच घेऊन जातो.*’

ह्या वाक्यांना पुढीलप्रमाणे डाव्या स्तंभात लिहा. किमान ५ वाक्ये शोधा. उजव्या स्तंभात तीच वाक्ये साध्या शब्दांत लिहायची आहेत.

नमुना:

| **मूळ वाक्य** | **बदल केलेले वाक्य** |
|---|---|
| *आषाढात मातीवर आलेली हिरव्यागार गवताची साथ श्रावणात जणू उतू जाते*’ | आषाढात मातीवर उगवलेले हिरवे गवत श्रावणात प्रचंड प्रमाणात वाढते. |

आता पुढील मुद्द्यांच्या आधारे आधी केलेल्या सरावाचा विचार करा व एका एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. पहिल्या स्तंभातील वाक्ये आणि दुसऱ्या स्तंभात बदल करून लिहिलेली वाक्ये ह्यात काय फरक पडलला?
२. दोन्ही वाक्यांच्या परिणामातील काय फरक पडला?
३. दोन्हीपैकी प्रभावी वाक्यरचना कोणती वाटते?
४. *मोरपंखी नजाकत, रंगांची श्रीमंती* ह्या सारख्या शब्दप्रतिमा का वापरल्या आहेत?
५. कोणत्या वाक्यांमधून लेखकाचे सूक्ष्म निरीक्षण दिसून येते?

**या पाठाच्या संदर्भात ह्या लिंक्स उघडून पहा.**

http://www.thinkmaharashtra.com/theva/%E0%A4%96%E0%A4%BE%E0%A4%A8%E0%A4%A6%E0%A5%87%E0%A4%B6%E0%A4%9A%E0%A5%80-%E0%A4%95%E0%A4%BE%E0%A4%A8%E0%A5%81%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%88

Divyamarathi.com